# चिंतन



## ‘गाव करी ते राव न करी’

# वेशीतच मिळवा रोजगार कशाला शोधायची नोकरी?

## ‘लोकल’ युवकच करेल देशाला ‘ग्लोबल’

डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादक: ‘पूर्वा कृषिदूत’)

- हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादन क्षमता भूमिती श्रेणीनं वाढली; मात्र बेसुमार रासायनिक कृषी निविष्ठांमुळे जैविक व्यवस्थेची अपार हानी झाली, लाखमोलाची मधमाशी दुखावली आणि फुलोऱ्याला दुरावली...
- या ‘क्रांती’च्या लाटेत दुर्लक्षित राहिलेल्या कडधान्ये– गळीत पिकांसाठी सुरू झालेलं ‘तेलबिया मिशन’ही फारसं फलदायी नाही ठरलं; परिणामी पामतेल आयात करणं भाग पडलं, यातून भेसळीचं संकट उभं राहिलं...
- तूर लागवडीच्या शासकीय आवाहनाला बळीराजानं यशस्वी प्रतिसाद दिला; परंतु त्याच्या कष्टांच्या जिवावर व्यापारीच गडगंज होऊन गेला, दामदुप्पट तूर पिकवणारा राहून गेला सुदामदेव...
- डाळी– तेलबियांसह ज्वारी, बाजरी, मक्यासारख्या पिकांची नियोजनबद्ध पेरणी असावी; ‘बारमाही’ म्हणाव्या अशा सूर्यफुलाची लागवड करावी, सुवर्णक्रांती करणाऱ्या मधमाशीला वर्षभर फुलोऱ्याची हमी मिळावी...
- मधमाशी पालनातून शेतीमाल उत्पादनात वृद्धी साधेल; यासाठी ग्रामीण युवा– युवतींनी मधमाशी पालनाचं शास्त्रीय प्रशिक्षण जरुर घ्यावं, मधासह इतर उपपदार्थांमधून रोजगार निर्मिती तर परागीभवन सेवेतून अर्थप्राप्तीही होईल...
- विविध तेलबिया पिकांच्या माध्यमातून खेडोपाडी– तालुका पातळीवर तेल उत्पादन सुरु व्हावं; चरितार्थाच्या शोधात असलेल्या युवा पिढीनं लघुउद्योजक बनून स्वावलंबी व्हावं...

गेल्या शतकात सन १९६५ ते १९७१ च्या दरम्यान भारतात ‘हरितक्रांती’ घडून आली. त्यापूर्वी आपल्याला पी.एल. ४८० करारानुसार अमेरिकेतून आयात होणारे निकृष्ट दर्जाचे धान्य खावे लागत होते. त्यात लाल ज्वारी (मिलो) आणि लाल गव्हाचा समावेश होता. स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्या वाढीचा वेग प्रचंड असल्यामुळे येणाऱ्या अन्नधान्याच्या उत्पादनावर जनतेची भूक भागवणं शक्य नव्हतं. डॉ. नॉर्मन बोरलॉग, डॉ. एम.एस. स्वामिनाथन, डॉ. ए.बी. जोशी व महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या अथक प्रयत्नांमुळे हरितक्रांती घडून आली. बाजरी, ज्वारी व मका यांचे संकरित वाण आणि गहू व भाताचे बुटके वाण आयात केले गेले. त्याला रासायनिक खते, पेस्टिसाईड्स (कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके इत्यादी) व ओलीत यांची जोड देण्यात आली. सुरवातीचे वाण तसे निकृष्टच होते. पण त्यांच्यामुळे जनतेची दोन वेळची भूक भागवता आली. यथावकाश भारतीय शास्त्रज्ञांनी आपल्या स्थानिक वाणांचा संकरकार्यात उपयोग करून चांगल्या जातींची निर्मिती केली. अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वावलंबी बनला. अनेक ठिकाणी गोदामं भरली. एवढेच नाही तर काही प्रमाणात निर्यातही सुरु झाली. मात्र पुढे रासायनिक खते, पेस्टिसाईड्स व ओलीत यांचा अविवेकी व

अतिरेकी वापर सुरू झाला. त्यामुळे हजारो हेक्टर जमिनी पाणथळ व क्षारपड झाल्या. विषारी फवारण्यांमुळे मित्रकिडी नष्ट झाल्या. किडींमध्ये प्रतिकारक्षमता वाढत गेली. सर्वत्र परागीभवन करणारा मधमाशी हा परोपकारी कीटकही या संकटातून वाचला नाही. रासायनिक अवशेषयुक्त खाद्यान्नामुळे समाजामध्ये कॅन्सरचे प्रमाणही वाढले.

## गळीतधान्ये व कडधान्ये यांचं उत्पादन वाढलं नाही

हरितक्रांतीमध्ये सर्वांचं लक्ष अन्नधान्याच्या उत्पादन वाढीवरच केंद्रित झालं होतं. त्यामुळे कडधान्ये व गळीतधान्ये दुर्लक्षित राहिली. केंद्र सरकारच्या हे ध्यानात आल्यावर सन १९८५ मध्ये 'तेलबिया मिशन'ची स्थापना करण्यात आली. या कमिशनचाही काही उपयोग झाल्याचे दिसत नाही. कारण आजही आपण करोडो रुपयांच्या खाद्यतेलाची दरवर्षी आयात करतो. त्यामध्ये इंडोनेशिया व मलेशिया या दोन देशांतून पाम तेलाची आयात होते. हे तेल आपल्या देशातील शेंगदाणा, सूर्यफूल, तीळ, करडई, मोहरी, सोयाबीन या तेलांच्या तुलनेत अतिशय कमी किंमतीत मिळते. त्यामुळे त्याचा जास्तीत जास्त वापर भेसळ करण्यासाठी केला जातो, अशी चर्चा होताना दिसते. शेंगदाण्याचा भाव सध्या १०० रुपये किलोच्या आसपास आहे. त्यामध्ये तेलाचे प्रमाण ४४-५५% असते. पेंडीमध्ये तेलाचा काही अंश असतोच. याचा अर्थ असा की १ किलो शेंगदाणा तेल तयार करण्यासाठी २ किलोपेक्षा अधिक शेंगदाणे लागतात. अशा परिस्थितीत विविध ब्रँडेड तेलं निर्माण करणाऱ्या कंपन्यांना त्यांचे तेल १५०- २०० रुपये किलो दराने विकणे कसे परवडते? आता तर पेट्रोल- डिझेलच्या वाढणाऱ्या किंमतींप्रमाणे खाद्यतेलाच्या किंमतीही दीड पटीने वाढल्या आहेत.

## शेतकरी कठीण आव्हानही स्वीकारतात

मागे २-४ वर्षांपूर्वी तुरीचं उत्पादन वाढवण्याचं आवाहन शासनाने शेतकऱ्यांना केलं होतं. त्यावेळी शेतकऱ्यांनी तुरीचं रेकॉर्ड ब्रेक उत्पादन काढलं होतं. तुरीची खरेदी करताना व साठवताना गोदामं कमी पडली होती. परंतु त्यावेळी विक्रीमध्ये शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनीच जास्त हात धुवून घेतले! असंख्य शेतकरी पेरणीपूर्वी सावकारांकडून कर्ज घेतात. पिकाचं उत्पादन आल्यावर सावकार तो माल कवडीमोल किंमतीने घेतात. शेतकऱ्यांसाठी असलेल्या सवलती शेतकऱ्यांना न मिळता व्यापाऱ्यांना किंवा सावकारांना मिळतात. राज्यातील काही भागातील शेतकऱ्यांची ही शोकांतिका आहे. आता उडीद डाळ आयात करण्याचे संकेत आहेत. शासनाने कोणतंही एकच एक पीक न ठरवता अधिक पिकांची लागवडीसाठी निवड करावी. तुरीबरोबर मूग, उडीद, हरभरा, मसूर तसेच भुईमूग, सूर्यफूल, सोयाबीन, मोहरी, तीळ, करडई, खुरासणी या पिकांनाही प्रोत्साहन दिले पाहिजे. या सर्व पिकांचे किफायतशीर हमीभाव ठरवून दिले पाहिजेत. खरेदीची सोय पंचक्रोशीतच करायला हवी. शेतकऱ्यांना एका दिवसात मोकळे केले पाहिजे. पीक तयार होण्यापूर्वीच सर्व खरेदी यंत्रणा तयार असायला हवी. गोदामं व प्रक्रिया उद्योग तयार असावेत.

## गावोगावी मधमाशी पालनाला चालना द्यावी

सूर्यफुलाच्या उत्पादनात मधमाश्यांच्या वसाहतींमुळे जवळपास तीनपट वाढ होत असल्याचा अनुभव शासनानेच घेतलेला आहे. प्रत्येक खेड्यामध्ये लोकसंख्येनुसार २-३ शेतकरी गटांची स्थापना करावी. काही गावांमध्ये ते आहेतच. प्रत्येक गटामधील काही तरुण- तरुणींनी मधमाशी पालनाचं ५ दिवसांचं प्रशिक्षण घ्यावं. काहींनी १ दिवसाचं प्रशिक्षण घेतलं तरी चालेल. अनुभवाने ते तरबेज होतील. प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रत्येक गटाने १० ते ५० मधमाशीच्या वसाहती (पेट्या) सांभाळाव्या. त्यासाठी मधमाश्यांना वर्षभर फुलोरा उपलब्ध होईल अशी पीकरचना गावाने राबवली पाहिजे. बाजरी, मका व ज्वारी ही भरपूर परागकण उपलब्ध करून देणारी पिके खरीप आणि रब्बी हंगामांमध्ये घेता येतील. अलीकडे बाजरी

उन्हाळी हंगामामध्येही घेतली जाते. मकरंद मिळवण्यासाठी गळीत धान्यांचे नियोजन करावे. सूर्यफूल हे पीक तीनही हंगामात घेता येते. अनेक राज्यांमध्ये सूर्यफुलाच्या उत्कृष्ट संकरित व सरळ जाती निर्माण झाल्या आहेत. हेक्टरी ४-५ पेट्या ठेवल्या तर मधाचंही उत्पादन घेता येईल. परागकणही जमा करता येतील. ते जमा करण्याचं तंत्र सोपं आहे. परागकणांनाही चांगला भाव मिळतो आणि औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांकडून प्रचंड मागणी आहे. पूर्वी भुईमूग हे महत्त्वाचं पीक खरीप हंगामात घेतलं जायचं. पावसाच्या लहरीपणामुळे ओलिताची सोय असलेले बरेच शेतकरी आता उन्हाळी भुईमूग घेतात. त्याचे उत्पादन चांगले मिळते. मधमाश्यांना या पिकाचा उपयोग होत नसला तरी खाद्यतेल व पेंड निर्मितीसाठी त्याचा मोठा हातभार लागणार आहे. खरीप हंगामात सूर्यफूल, सोयाबीन, तीळ व खुरासणी ही पिके घेता येतील. रब्बी हंगामात मोहरी, करडई, सूर्यफूल व ज्वारी या पिकांची लागवड करता येईल.
फळझाडांमध्ये शेवगा लागवड अलीकडे वाढताना दिसते. आवळा व डाळिंब यांचीही राज्याच्या अनेक भागात लागवड झाली आहे. आंब्याचीही लागवड भरपूर झालेली आहे. कलिंगड, खरबूज व इतर काकडीवर्गीय पिकांची लागवड करता येईल. मधमाशीपालनामुळे खेड्यातील तरुण- तरुणींना रोजगार उपलब्ध होईल. मधापासून व परागकणांपासून उत्पन्नाचं साधन निर्माण होईल.

## 'ग्रुप'च्या माध्यमातून लघुउद्योग सुरू करता येतील

सध्या लाकडी घाण्यापासून तयार केलेल्या गोडेतेलाला प्रचंड मागणी आहे. त्यामुळे गावातील प्रत्येक ग्रुपला १ लाकडी घाणा सुरू करता येईल. ग्रुपमधील शेतकऱ्यांच्या धान्यापासून तेल काढता येईल. त्याची योग्य ती पॅकिंग करून ब्रँडिंग करता येईल. चांगल्या ब्रँडला शहरातूनही मागणी येऊ शकते. गावातील ग्रुपमध्ये नसलेल्या व शेजारील गावातील शेतकऱ्यांच्या धान्यापासून तेल काढून देता येईल. त्यापासून ग्रुपला उत्पन्न वाढवता येईल.

गावातील तूर, उडीद व मूग यांच्या डाळी करण्यासाठी प्रत्येक ग्रुपने १ लहान डाळमिल खरेदी करावी. या डाळींचे सुद्धा ब्रँडिंग करून विक्री करता येईल. तेलाप्रमाणेच इतर शेतकऱ्यांच्या धान्याच्या डाळी करून देता येतील. यामुळे गावात रोजगार निर्मिती होऊ शकेल. धान्यापासून तेल आणि डाळी तयार करून विक्री केल्यामुळे जास्त फायदा होईल.

गावाचा विकास होण्यासाठी गावात कुक्कुटपालन, शेळीपालन, देशी गायींचे पालन, प्रक्रिया उद्योग यांची शेतीला जोड देता येईल. देशी गाईचे दूध, मूत्र व शेण यांना सेंद्रिय शेतीमध्ये खूप मागणी आहे. गावातील शेती 'सेंद्रिय शेती' बनवण्यासाठी या दुय्यम उद्योगांमुळे फायदा होईल.

## देशाच्या विकासातील विविध अडचणी

अल्पभूधारक शेतकऱ्यांची वाढणारी संख्या, भांडवलाचा अभाव, जागतिक हवामानातील बदल, निसर्गाचा लहरीपणा- दुष्काळ आणि पाऊस, गारपीट, पावसातील मोठे खंड, थंडीची लाट, उष्णतेचा कडाका, अवकाळी पाऊस, बाजारभाव, रासायनिक निविष्ठा वापरण्याची घातक सवय, शेतकऱ्यांनीच शेती व्यवसायाला कमी लेखण्याची वृत्ती अशा अनेक कारणांमुळे भारतीय शेतीचा विकास कुंठित झालेला आहे.

वंशपरंपरेनुसार शेतकरी कुटुंबाची विभागणी झाल्यावर जमिनीचे तुकडे होत आहेत. हे तुकडे गावातील शिवारांमध्ये विखुरलेले आहेत. देशात ८०% पेक्षा अधिक शेतकरी अल्पभूधारक आहेत. या लहान तुकड्यांमुळे शेती करणे अनेक दृष्टीने परवडत नाही. मशिनरीचा वापर करता येत नाही. बैलजोडी व औजारे बाळगणे शक्य होत नाही. स्वत:ची औजारे व बैलजोडी नसल्यामुळे नांगरणी, वखरणी, पेरणी, कोळपणी इत्यादी कामे वेळेवर करता येत नाहीत. त्याचा उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो.

## जागतिक हवामानातील बदल नुकसानकारक ठरतायत

वर्षानुवर्षे हवामानामध्ये जगातील सर्व कानाकोपऱ्यांत प्रचंड बदल घडून येत आहेत. भारताबरोबरच चीन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप अशा विविध ठिकाणी लोक हवामान बदलाचे तडाखे सहन करीत आहेत. त्यामुळे पिकांची, जीवितांची, भौतिक व आर्थिक हानी होताना दिसते. या संकटावर मात करण्याचा विचार करण्यासाठी जगातील सर्वच देशांतील प्रतिनिधी दर दोन वर्षांनी अमेरिकेतील जनरल असेम्ब्लीमध्ये भेटतात. या 'ऑल वर्ल्ड रिलिजन ॲण्ड पीस' जागतिक परिषदेसाठी आपल्या भारतातील उडुपी मठाचे सुगुणेंद्रतीर्थ स्वामीजी यांची पाच वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. एप्रिल २०१५ मध्ये अमेरिकेतील जनरल असेम्ब्लीमध्ये त्यांचं भाषण झालं होतं. तेव्हा 'क्लायमेटिक डिसऑर्डर'वर मात करण्यासाठी वेदांतील यज्ञसंस्कृतीचं महत्त्व त्यांनी सर्वांपुढे मांडलं. सोमयागामुळे होणारे पर्जन्यावरचे व इतर पंचमहाभूतांवरचे अनुकूल परिणाम हवामानातील बदलाला थोपवू शकणार आहेत, हे त्यांनी सर्व जगापुढे मांडलं. सोमवल्लीच्या रसाच्या हवनामुळे अनेक किलोमीटर परिसरातील क्षेत्र अनारोग्याला कारण ठरणाऱ्या जिवाणू- विषाणूंपासून मुक्त होत असल्याचे दाखले आहेत. या कोरोना महामारीच्या काळात सोमयाग उपयोगी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु या गोष्टीकडे कुणाचेच लक्ष जात नाही. पावसाळा हा हंगाम अलीकडे सीमित राहिलेला नाही. तो वर्षभरातील कोणत्याही महिन्यात आणि कितीही बरसतो! शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेतो. शेतकऱ्यांचे कष्ट व खर्च वाया घालवतो. गारपीट होते. वारा-वादळामुळे पिकं भुईसपाट होतात, सडतात. त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतच जातो.

या बदलत्या परिस्थितीमध्ये नव्या तंत्राने शेती करावी लागणार आहे. अवेळी पडणारा पाऊस, तापमानातील बदल तसंच कीडरोग यांच्यापासून संरक्षण करणाऱ्या तंत्राचा वापर करावा लागेल. अर्थातच त्याला मोठ्या भांडवलाची गरज भासणार आहे. पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी मोठमोठे शेततलाव बांधावे लागतील. मोठमोठी पॉलिहाऊसेस उभारावी लागतील. पावसापासून रक्षण करण्यासाठी नेटस्चा वापर करावा लागेल. हे सर्व तंत्र अंमलात आणण्यासाठी जास्त भांडवलाची गरज भासेल. चांगली आर्थिक परिस्थिती असणारे शेतकरी फारच थोडे आहेत. त्यासाठी गटशेती करून भांडवल उभारणी करावी लागेल. शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करावी लागेल. अशा उपायांमधून अल्पभूधारक शेतकरी विकास साधू शकतील.

शेतकऱ्यांची बरीचशी मुलं जास्त शिक्षण घेऊ शकत नाहीत. उच्च शिक्षणाचा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही. ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळा, विद्यालये व महाविद्यालये अतिशय कमी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची बरीचशी मुलं १० वी, १२ वी किंवा महाविद्यालयातील शिक्षण अर्धवट सोडून घरीच असतात. त्यातील बहुतेक विद्यार्थी शेतीचं काम करणं कमीपणाचं मानतात. त्यामुळे 'धोबीका कुत्ता न घरका ना घाटका' अशी त्यांची स्थिती होते. काही मुलं चांगली शेती करतात. काही चांगला उद्योगधंदा करतात. तथापि शेतकरी मात्र अशा मुलांनाही आपली मुलगी द्यायला तयार होत नाहीत. त्यांना नोकरी करणाराच जावई हवा असतो. नोकरी मग ती शिपायाची असली तरी चालेल, पण लखपती शेतकऱ्याचा मुलगा नको असतो! ही प्रवृत्ती ग्रामीण समाजासाठी अतिशय घातक आहे. ऐन उमेदीचं तरुण वय उलटून गेलं तरीही मुलांची लग्नं जमत नाहीत. लग्नाच्या बाबतीत फसवणुकीचे प्रकार उघडकीस येत आहेत. शेतकरीच आपल्या व्यवसायाचा अवमान करीत आहेत. या परिस्थितीत सुधारणा झाली पाहिजे. देशाचा विकास व्हायचा असेल तर खेडी स्वावलंबी झाली पाहिजेत. शेतीला विविध उद्योगधंद्यांची जोड दिली पाहिजे. मधमाशीपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन, देशी गोपालन, लाकडी घाणे व डाळमिल यांच्या आधाराने खेडोपाडी आर्थिक स्वयंपूर्णता आली पाहिजे, असे वाटते. ■